# निशाणी क्र. २९२ वरील आदेश

वादींनी नि.क्र. १७९ सोबत दाखल केले कागदपत्रांच्या प्रती प्रतिवादींना देण्याबाबत आदेश होण्यासाठी प्रतिवादींनी प्रस्तुतचा अर्ज दाखल केला आहे.

२. अर्ज व म्हणणे अवलोकन केले. वादी व प्रतिवादींतर्फे विद्वान विधिज्ञांचा युक्तीवाद ऐकण्यात आला.

३. वादींनी दिनांक २१/०६/२०१६ रोजी नि.क्र. १७९ सोबत एकूण २९ कागद दाखल केले आहेत. प्रतिवादी यांना या कागदांच्या प्रती मिळाल्या अशी प्रतिवादींची पोहोच सदर कागद यादीवर दिसून येत नाही. या यादी सोबत त्याच्या प्रती असल्याचे देखील दिसून येत नाही. त्यामुळे या कागदपत्रांच्या प्रती वादींनी प्रतिवादींना देणे आवश्यक व गरजेचे आहे. तथापि, सदर कागद हे २०१६ साली दाखल करण्यात आले आहेत व त्याच्या प्रती मिळालेल्या नाहीत अशी तक्रार प्रतिवादी हे २०२३ मध्ये करत आहेत. हा अर्ज देण्यापूर्वी सदर प्रकरणी प्रतिवादींनी वादी साक्षीदाराचा उलटतपास घ्यायचा होता. अशा वेळी प्रतिवादींनी हा अर्ज दिला आहे. त्यामुळे इतक्या उशिरा हा अर्ज देणे ही देखील प्रतिवादींची वर्तणूक योग्य वाटत नाही. प्रस्तुतचे प्रकरण हे १० वर्ष जुने आहे. सबब, अशा जुन्या प्रकरणामध्ये ही विलंबाची वृत्ती योग्य वाटत नाही. सबब, वरील कारणास्तव हा अर्ज मंजूर होणेस पात्र आहे असे मला वाटते. परिणामी, मी खालीलप्रमाणे आदेश पारित करीत आहे :

## <u>आदेश</u>

१. अर्ज मंजूर करण्यात येतो.

२. वादींनी प्रतिवादी यांच्यासाठी नि.क्र. १७९ सोबतच्या कागदपत्रांच्या प्रती पुढील तारखेपर्यंत दयाव्यात.

३. खर्चाबाबत आदेश नाही.

GIRISH SUDARSHAN MANE
Digitally signed by GIRISH SUDARSHAN MANE
Date: 2023.02.24 16:53:57 +0530

स्थळ : कोरेगाव ( गि. सु. माने )

दिनांक २४/०२/२०२३ दिवाणी न्यायाधीश क. स्तर कोरेगाव.